जननी ॥ १० ॥ तुझी कृपा होतां पूर्ण । पंगू उल्लंघी गिरीलागून । मुका होय वक्ता जाण । अंधशास्त्र पाहतसे ॥ ११ ॥ तूं शब्दसृष्टीची ईश्वरी । सकळ सिद्धि तुझे करीं । माझे हेतू पूर्ण करी । हेंचि मागणें गणूचें ॥ १२ ॥ त्वां मम मुखीं वास करावा । मम मुखें ग्रंथ वद-वावा । ही सज्जनांची घडो सेवा । तव कृपें माझ्या करें ॥ १३ ॥ जयजयाजी उमावरा । भक्तहृदयानंदकरा । मायातीता सर्वेश्वरा । पंचवदना विरूपाक्षा ॥ १४ ॥ जयजयाजी दक्षमखविध्वंसका । जयजयाजी षडास्यजनका । जयाजयाजी कामांतका । भवानीशा गंगाधरा ॥१५॥ तूं निर्गुण निराकार । तूं एक वस्तूपर । तूं पूर्णब्रह्म साचार । गुणत्रय रहित तूं ॥ १६ ॥ तूं ॐकाररूप परमेश्वर । तव ठाईं न ते षड्विकार । तूं एक जगदाधार । जगद्गुरु जगदात्मा ॥१७॥ बाल्य तारुण्य वृद्धावस्था । तुज नाहीं उमानाथा । जागृति सुषुप्ति विरहिता । एक तूच असती ॥ १८ ॥ स्थावरजंगमादि सर्व कांहीं । दृश्य ज्ञेय वस्तू पाहीं । सामावल्या तुझे ठायीं । तव वेगळें कांहीं नसे ॥ १९ ॥ तुज वर्णितां वेद शिणले । तत्त्ववेत्ते योगी भागले । परी न तुझ स्वरूप कळलें । जगदोद्धारा विश्वंभरा ॥ २० ॥ तेथें मी अल्पमती । केवीं वर्णू तुजप्रती । तव विराट्रूपा निश्चिती । जाणण्या मी अज्ञ असें ॥ २१ ॥ यास्तव तुझ्या ज्या साकार विभूती । त्याच मा स्तवितों पशुपती । तव अर्भक मी निश्चितीं । माझी उपेक्षा करूं नको ॥ २२ ॥ जयजयाजी भाललोचना । भवभवांतक त्रिपुरदहना । विश्वनाथा करुणाघना । पाव वेगें गणूसी ॥ २३ ॥ पुराणपुरुषा असुरांतका । भवशोषणा अशिवहारका । जगन्निवासा शिवदायका । कृपा कीजे मजवरी ॥ २४ ॥ केदारेश्वर तुझें नाम । तूं योगि-यांचा विश्राम । निजभक्तांचा कल्पद्रुम । असती तूं सर्वथा ॥ २५ ॥ हे शूली सोमनाथा । महाकाळ कालातीता । ॐकारा मैलजाप्राया ।

त्र्यंबकेशा पाव वेगें ॥ २६ ॥ हे भर्गा भीमाशंकरा । वैजनाथा त्रिताप-
हरा । मल्लिकार्जुना घृष्णेश्वरा । रामेश्वरा जगद्गुरा ॥ २७ ॥ हे कृष्णा-
तटविहारा । मम आराध्यदैवता कोटेश्वरा । शिंगणापुरनिवासिया
शंकरा । ग्रंथ करवीं संपूर्ण हा ॥ २८ ॥ जेवीं लहान मुलाप्रति । गुरु
हस्त धरोनि लिहवीती । तेवीं करीं गा उमापती । ग्रंथ लिहवीं
ममकरें ॥२९॥ तूं मन्मनीं करी वास । ग्रंथ वदवीं हा सुरस । विघ्न
ना होवो कधीं यास । हेंचि मागणें गणूचें ॥ ३० ॥ जयजय
भीमातटनिवासी केशवा । पूर्णब्रह्मानंदा रमाधवा । संतादिकांचा
विसांवा । तुजविणें कवण असे ॥ ३१ ॥ जयजय वैकुंठनिवासी
लक्ष्मीवरा । पीतवसनाशार्ङ्गधरा । गजास्यजनक प्रियकरा ।
महाराजा समर्था ॥ ३२ ॥ जयजयाजी सच्चिदानंदा । राधाधर-
मधुमिलिंदा । आनंदकंदा गोविंदा । नरकांतका मुरारे ॥ ३३ ॥
जयजयाजी कृपाघना । कोमलांगा राजीवनयना । आजानबाहो
सुहास्यवदना । मम इच्छा पूर्ण करी ॥३४॥ या भक्तलीलामृतग्रंथा ।
मी होय आजी रचिता । परि हा पूर्ण कीजे अनंता । लाज माझी
राखणें ॥ ३५ ॥ हे औदुंबरनिवासी दत्तात्रया । नमन माझें तुझे
पायां । वेळ ना कीजे वर द्यावया । वाट पाहे दास गणू ॥ ३६ ॥
जयजयाजी महामंगला । मोहिनीशा विश्वपाळा । तुझे चरणीं ठेवितों
भाला । माझी इच्छा पूर्ण करीं ॥ ३७ ॥ तूं कृपेचा कृपाघन । तूं
सच्चिदानंद नारायण । इच्छित माझें मज देऊन । सुखी करी
गणूसी ॥ ३८ ॥ तूं जरी मातें उपेक्षीसी । तरी मी मागूं कवणासी ।
परम समर्था कृपाराशी । ग्रंथ करवी संपूर्ण हा ॥ ३९ ॥ हे सज्जन-
गडस्थ समर्था । श्रीरामदासा पुण्यवंता । धरून लेंकराचे हाता ।
नेई पैल तटासी ॥ ४० ॥ जयजय श्रीपुरनिवासी गुरुराजा । मल्हा-
रराज महाराजा । धांवें पावें भक्तकाजा । उपेक्षीना सर्वथा ॥ ४१ ॥

इसलामपुरकर कुलभूषणा। ज्ञानार्का ज्ञानघना। पंडितवर्या श्रीवामना। कीजे कार्य संपूर्ण हें ॥ ४२ ॥ तूं जननीजनिता सद्गुरु। तूंचि माझा कल्पतरु। तूं करुणेचा सागरु। कृपाकटाक्षे अवलोकिजे ॥४३॥ आतां वंदूं कवींप्रती। ज्यांचे ठायीं वसे सरस्वती। ते व्यास वाल्मीक प्रभृति। वंद्य माते सर्वदा ॥ ४४ ॥ तैसे गीर्वाण भाषापटू। कालिदासादि बाणभट्ट। जयांची काव्यशक्ति अचाट। ते सर्व मी वंदितसें ॥ ४५ ॥ आतां प्राकृत कवीश्वर। तुकारामादि ज्ञानेश्वर। मुकुंदराज कबीर। आनंदतनय पंतपंडित ॥ ४६ ॥ आतां वंदूं जननिजनिता। जीं मम दैवते तत्त्वतां। तयांचिया चरणीं माथा। ठेवितां कार्यसिद्धि होय ॥ ४७ ॥ आतां वंदन श्रोत्यांप्रती। तुह्मीं सज्जन परिस निश्चितीं। मी लोह हीनजाती। मजला हेम करावें ॥ ४८ ॥ हा भक्तलीलामृतग्रंथ कल्पद्रुम। भक्तलीला हीं फळें उत्तम। पद्यरचना हीं शोभायमान। पर्णें साच तयाचीं ॥ ४९ ॥ मागें महिपती नामें कवीश्वर। त्यांनीं रचिला ग्रंथ सुंदर। नाम भक्तिविजय साचार। महती थोर तयाची ॥ ५० ॥ त्या भक्तिविजय ग्रंथांतरीं। येवोनि गेले नानापरी। तारक जे कां भवसागरीं। ऐसे थोर महात्मे ॥५१॥ त्या मी येथें समग्र कथा। जरी झालों आज वर्णिता। तरी होईल विस्तार ग्रंथा। ह्मणोनि ध्वनितार्थ बोलतों ॥ ५२ ॥ जयदेवस्वामी परम पावन। गीतगोविंदें स्तविला नारायण। मृत भार्या उठविली जाण। थोर महती तयाची ॥ ५३ ॥ वाल्मिकि पुनरपि जन्मास। होवोनि आला तुळसीदास। जन लाविले रामभक्तीस। असंख्य पतित तारिले ॥ ५४ ॥ शुक झाला कबीर। ज्याचा विणकरी शार्ङ्गधर। शेला विणोनि सुंदर। दिधलासे कबीराप्रती ॥ ५५ ॥ निवृत्ती ज्ञानदेव सोपान। मुक्ताबाई गुणनिधान। हीं चार भावंडें सुलक्षण। प्रती ईश्वर असती ॥ ५६ ॥ रेड्यामुखें वेद वदविले।

निर्जीव भिंतीस चाळविलें। चांगदेवाचें मीपण हरिलें। ज्ञानेशें रचिली ज्ञानेश्वरी ॥ ५७ ॥ चंद्रभागेचिया तटीं। महावैष्णव दामाशेटी। तयास शिंपल्याचे पोटीं। नामा रत्न सांपडलें ॥ ५८ ॥ ज्यानें हरितें आपुलें केलें। नागनाथाचें देऊळ फिरविलें। असंख्य अभंग रचिले। पतितोद्धारा कारणें ॥ ५९ ॥ थोटा पंगू कूर्मदास। निजांगें गेला पंढरीस। सावत्यानें जगन्निवास। उदरामाजी सांठविला ॥ ६० ॥ गोरा तेरढोकीकर। राका कुंभार गुर्जर। दोघेही भक्त थोर। करतलस्थ फोड हरीचे ॥६१॥ जगमित्र नागा सज्जन। जयातें व्याघ्ररूप धरोन। शार्ङ्गधरें दिधलें दर्शन। कृतार्थ केलें जयाला ॥ ६२ ॥ जोगाप्पा चोखादासी जनी। सेना रोहिदास महाज्ञानी। नरसीमेहता गुर्जर वाणी। महा वैष्णव सुरदास ॥ ६३ ॥ मिराबाई कान्होपात्रा। विदित असे कीं सर्वत्रां। शेख महंमद झाला त्राता। भवार्णवीं बुडत्यातें ॥ ६४ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथ। झाला भगवद्भक्त विख्यात। जयाचे घरीं रावत। श्रीखंड्या होऊनी श्रीहरी ॥ ६५ ॥ मंगळवेढ्यांत वैष्णव वीर। पंतदामाजी कृपासागर। जयाकारणे झाला महार। जगद्गुरु जगदात्मा ॥ ६६ ॥ सद्गुरु स्वामी जनार्दन। तैसाच भानुदास गुणनिधान। रामदास वैराग्यखाण। समर्थ जन म्हणती जया ॥ ६७ ॥ तुकाराम साधु देहूकर। केवळ वैराग्यसागर। भक्तांमाजी अग्रेसर। आवडे हरीतें प्राणाहुनी ॥ ६८ ॥ धन्य धन्य तो बोधला। भक्तमालेंत हिरा शोभला। कीर्तनरंगीं सजीव झाला। नाचूं लागला आनंदें ॥ ६९ ॥ चंद्रभागा भरली अपार। यात्रेस आले संतोबा पवार। देव होवोनियां मगर। यात्रा नेली पैलतीरा ॥ ७० ॥ ऐशा संतांलागूनी। मागें वर्णिलें महिपतींनीं। भक्तिविजय ग्रंथ करोनी। अमृत पाजिलें सकळिकां ॥ ७१ ॥ निंबराज महाराज दैठणकर।

जया स्कंदीं परमेश्वर। बैसतसे कमलावर। भक्तवत्सल श्रीहरी ॥७२॥ यास्तव आतां यांविरहित। जे झाले भगवद्भक्त। तयांतें मी वर्णितों येथ। सत्कृपेनें तयांच्या ॥ ७३ ॥ ज्यांच्या कथा पुण्यकारक॥ पापतापदैन्यहारक। मुमुक्षूतें मोक्षदायक। कल्पतरू कामुकांच्या ॥ ७४ ॥ जे संत केवळ चिंतामणि। ज्यांचा आज्ञांकित चक्रपाणी। ज्यांच्या दर्शनें करोनी। महापापें भस्म होती ॥ ७५ ॥ ज्यांनीं षड्रिपु जिंकिले। तैसेंच मीतूंपण टाकिलें। मोक्षाचें भांडार लुटिलें। जें कां दुर्मिळ इतरांप्रती ॥ ७६ ॥ किंवा जे भवार्णवींचि नौका। अथवा स्वर्गींचे सोपान देखा। प्रिय जे कां जगन्नायका। प्राणाहुनी अत्यंत ॥ ७७ ॥ सितावेदरे ऐक आतां। अर्वाचीन भक्तकथा। आपणां ज्या उभयतां। कृतार्थ वेडे करतील ॥ ७८ ॥ आतां श्रोते सावधान। पुढीलाध्यायीं कथेचें अनुसंधान। हा नमनाध्याय झाला पूर्ण। कृपाकटाक्षें शंकराच्या ॥ ७९ ॥ ही दास गणूची आर्श बोली। पाहिजे तुम्हीं गोड केली। कृपेची करणें सांउली। दासावरी सर्वदा ॥८०॥ हा भक्तलीलामृत ग्रंथ महातिथी। भक्तलीला ही भागीरथी। सेवितां मनेच्छा पूर्ण होती। प्रथमोऽध्याय गोड हा ॥ ८१ ॥

॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥



श्रीगणेशाय नमः ॥ तूं जगाची चिच्छक्ति । तूं विश्वंभर विश्वमूर्ति । तूं सूत्रधार निश्चितीं । तुझ्या नाटका न वर्णवे ॥ १ ॥ जेथें वेदासही पडला विचार । तेथें मी किती अज्ञान पोर । टिटवीनें कां सागर । उपसवेल दयाळा ॥ २ ॥ ऐसा तूं परम अचिंत्य । नाहींस म्हणावें परि न उचित । कां कीं क्षणाक्षणा साक्ष येत । तुझ्या असणेपणाची ॥ ३ ॥ ऐसा जो जगदाधार । परम दयाळू सर्वेश्वर । तो कृपा करो माझेवर । दीनानाथ दीनबंधु ॥ ४ ॥ त्याच प्रभूच्या कृपेनें । मी हें करितों बोलणें । त्याच प्रभूच्या सत्तेनें । लिहितसें मी या ग्रंथा ॥ ५ ॥ अहमदनगर जिल्ह्याभीतरीं । गोदा-भीमेच्या मध्यंतरीं । तालुका असे राहुरी । थडी मुळा प्रवरेची ॥६॥ ऐशा त्या तालुक्यांत । ताहराबाद गांव सत्य । जेथील कुळकर्णी विख्यात । कांबळे उपनांव जयांचें ॥ ७ ॥ जे शाकल शाखेचे ब्राह्मण । ऋग्वेदी आश्वलायन । त्या कुळकर्णीवंशीं जाण । जन्म पावले महिपती ॥ ८ ॥ महिपती आपुले पित्याला । ज्ञातारपणा-माजी झाला । शके सोळाशें सदतीसाला । ताहराबादेमाझारीं ॥ ९ ॥ महिपती स्वरूपें सुंदर । दुसरा पंचबाण मन्मथशर । तारुण्य अव-स्थेंत साचार । करूं लागला कुळकर्ण ॥ १० ॥ स्वरूपसंपत्ती ज्यापाशीं । तो बहुधा निघे विलासी । आत्मज्ञान वा सद्भक्तीशीं । विरळा सुंदर ओळखी ॥११॥ ऐसा नव्हता महिपती । पूर्ण निष्ठा धर्मावरती । भूतदया जागृत अति । होती ज्याच्या मनामध्यें ॥१२॥ नित्य रुक्मिणीपांडुरंगाची । पूजा करी प्रेमें साची । जहागिर सगुण उपासनेची । मेळविली जयानें ॥ १३ ॥ धन्य धन्य ती सगुणभक्ती । सेव्यसेवकभाव जागृती । रहातसे प्रेमाप्रती । भरती येत चित्तांत॥१४॥ ऐशी भक्ति ज्याचे हाता । आली तोच धन्य तत्वतां । पुढें तोच पूर्णत्वा ।-प्रती जातो निश्चयें ॥ १५ ॥ असो एके दिनीं महिपती ।

बसले असतां पूजेप्रती। आला चपरासी शीघ्रगती। बोलावण्या तयांस ॥ १६ ॥ चपरासी म्हणे महिपतीस। आतांचे आतां कचेरीस। चला बाहिलें तुम्हांस। महालकऱ्यांनीं येच वेळां ॥ १७ ॥ महिपती म्हणती ते अवसरीं। येतों पूजा झाल्यावरी। आपण थांबा तोंवरी। कृपा करा माझेवर ॥ १८ ॥ तें न मानी चपरासी। दुरुत्तरें बोले बहुवशी। आतांच नेईन कचेरीशीं। तुजला मी कुळकर्ण्या ॥ १९ ॥ महिपतींचा निरुपाय झाला। नमन करून देवाला। दफ्तर घेऊन कचेरीला। गेले चपराशाबरोबर ॥ २० ॥ काम होतें तें सारिलें। महिपती स्वगृहा आले। विठ्ठला पुढें उभे ठेले। बाप आपुला जाणोनी ॥ २१ ॥ हे पंढरीशा रमारंगा। भवभयभंगा पांडुरंगा। आदिअनादि प्रतापतुंगा। श्रीविठ्ठला विश्वपते ॥ २२ ॥ पदरीं वृत्ती कुळकर्ण्याची। म्हणून राहिली पूजा साची। आतां तरी या लेंकराची। देवा उपेक्षा करूं नको ॥ २३ ॥ कानांत होती लेखणी। ती ठेवून विठ्ठलचरणीं। प्रतिज्ञा केली महिपतींनीं। त्रासून आपल्या वृत्तीला ॥ २४ ॥ आजपासून देवदेवा। मी न करीं राजसेवा। लेखणी करीं केशवा। न धरीं या वृत्तीस्तव ॥ २५ ॥ पुढेंही सप्त पिढ्यांपर्यंत। कोणी न कुळकर्ण करावें सत्य। आग लागो त्या वृत्तीप्रत। परमार्थीं विघ्न करणारी ॥ २६ ॥ ऐसी प्रतिज्ञा करून। महिपती झाले विदेही पूर्ण। अखंड करिती नामस्मरण। रुक्मिणीपती विठ्ठलाचें ॥ २७ ॥ बहुत वेळ लुटविलें घर। मानून संसार क्षणभंगुर। चित्त झालें बहुत आतुर। परब्रह्म साधावया ॥ २८ ॥ एके दिनीं तुकोबा स्वप्नांत। बोलले त्या महिपतीप्रत। त्वां संतचरितें गावीं सत्य। जगदोद्धार करावया ॥ २९ ॥ वेदांनीं केला विचार। कैसा कोण परमेश्वर। तत्प्राप्तीचे प्रकार। पुराणांनीं कथन केले ॥ ३० ॥ पुढें कालचक्र फिरलें। गीर्वाण भाषाभिज्ञ

श्री

यशोदापांडुरंगी या नांवाच्या टीकेसहित

# केकावलि.

सदाश्रितपदासदाशिवमनोविनोदास्पदा ।
स्वदासवशमानसाकलिमलांतकाकामदा ॥
वदान्यजनसद्गुरोप्रशमितामितासन्मदा ।
गदारिदरनंदकांबुजधरानमस्तेसदा ॥ १ ॥

## प्रस्ताव.

या प्रथम श्लोकांत सारीं नामें भगवद्गुणविशिष्टविशेषणात्मक व संबोधनात्मक आहेत, अतएव शिष्टकविसंप्रदायानुरूप ही केका केवळ मंगलाचरणात्मिका अशी जाणिली पाहिजे. हा मूलग्रंथ मुख्यत्वें कृष्णस्तुतिपर असल्यानें ही वैष्णवी स्तुति मानिली असतां बाध येणार नाहीं. त्यांत प्रथमतः भगवंताचे भक्तवात्सल्य-शरणागतदुरितनिवारकत्वादि जे भक्तजनांस अत्यंत इष्ट गुण तेच उद्देशून मोरोपंत कवि स्तुतीस आरंभ करतात. त्यांत ते प्रथमतः या पहिल्या केकेंत प्रार्थनापूर्वक नमस्कार समर्पितात. परंतु कोणाचीहि प्रार्थना कर्तव्य असतां ज्याची प्रार्थना करावयाची, त्याचें अव्यवहित अवधान प्रार्थकानें आपल्याकडेस लावून घेणें हें प्रथम कार्य असे जाणून मोरोपंत या केकेत भगवंतास संबुद्धीनें म्हणजे हाक मारून अत्यंत विनयतेनें नमस्कार करितात.

## टीका

पदान्वयः—सदाश्रितपदा, सदाशिवमनोविनोदास्पदा, स्वदासवशमानसा, कलिमलांतका, कामदा, वदान्यजनसद्गुरो, प्रशमितामितासन्मदा, गदारिदरनंद-कांबुजधरा ते सदा नमः

सदाश्रितपदा,—हे सदाश्रितपदा,-सत् म्हणजे साधु नारदादि, त्यांनीं-आश्रित आहेत पद म्हणजे पाय ज्याचे असा तू;-तुझ्या पायांवांचून दुसरें शरण्य अथवा समाधानस्थान नाहीं, त्यांच्या आश्रयणावांचून दुसरा कोणताही तरणोपाय नाहीं, असा पूर्ण निश्चय करून नारदकपिलव्यासवाल्मीकादि जे महाज्ञानी झाले त्यांनींहि त्यांचाच आश्रय केला,-येणेंकरून भगवद्भक्ति हाच काय तो ज्ञानाचा

परिपाक, हेंच काय तें ज्ञानाचें मुख्य आश्रयस्थान, पुष्कळ बुद्धिमान् पुरुषांची बुद्धि अस्थिर होत्साती सैरावैरा धांवती, परंतु शेवटीं ती भगवद्भक्तींतच विश्राम पावती, पुष्कळाचे ज्ञानतरंग या भवसागरीं नानारूपांनी प्रकटित होतात, परंतु ते अनेक घोटाळे खाबून शेवटीं तुझ्या भक्तीशिवाय दुसरें तीर नसल्यानें तेथेंच लीन होणें त्यांस प्राप्त होतें, असा येथील गूढार्थ जाणावा; हाच अर्थ पुढल्या विशेषणांनीं स्पष्ट करून दाखविला आहे. कदाचित् आपण पुसाल कीं, माझ्या भक्तीच्या प्रेमांत असा कोण निमग्न आहे? त्यास, मानवांची तर कथा काय सांगावी, परंतु सर्व देवगणांत श्रेष्ठ, जो आपल्या त्रयींतला, असा महेश, त्याच्याहि आनंदाचें स्थान आपणच आहां, अशी आशंका निवारित होत्साते कवि पुढलें विशेपण देऊन म्हणतात,—**सदाशिवमनोविनोदास्पदा**,—हे सदाशिवमनोविनोदास्पदा,-सदाशिव-महादेव, त्याचा जो-मनोविनोद-मनाचा हर्ष, त्या हर्षाचें-आस्पद-स्थान-कारण-आद्यमूल तू आहेस; तुझाच महिमा मनांत आणून हर्षयुक्त होत्साता शिव तांडव करितो. अथवा, सदाशिव-तमोगुणोद्भव जगत्संहारकर्त्री कालात्मक कालभैरवरूप जी व्यक्ति, तिचा-मनोविनोद-मनोविलास-जगत्संहरणरूप मनो-

---

१ महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥

भ. गी. अ. ९, श्लो० १३

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ॥
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥

—श्लो० १४

आलोड्य सर्वशास्त्राणि विचार्य च पुनः पुनः ।
इदमेकं सुनिष्पन्नं ध्येयो नारायणः सदा ॥

महाभारतेव्यासोक्तिः

तुका म्हणे सार दृढ पाय धरावे ॥

—तुकाराम.

बोलणेंचि नाहीं आतां देवावीण कांहीं ।
एकसरें केला नेम देवा दिल्हे क्रोधकाम ॥
पाहेन ते पाय जोंवरि हे दृष्टिधाय ।
तुका म्हणे मनें हेंचि संकल्प वहाणें ॥

—तुकाराम.

व्यापार इ० त्यांचे-आस्पद्-स्थान-कारण-मूलप्रेरणा, एतद्रूप असा तूं, अर्थात् त्वां प्रेरणा केली आहे, त्वां अधिकार दिला आहे, म्हणूनच कालभैरव या जगताचें संहरण करितो, त्या प्रेरणेवांचून इतकें महत्कार्य करण्यास तो केवळ असमर्थ असा ध्वन्यर्थ जाणावा. अथवा या विशेषणांत सदा-निरंतर, हें पद निराळें काढून, **शिवमनोविनोदास्पदा** असें एक पद केलें तथापि सांगितल्या सर्व अर्थांची योजना तशीच राहून अर्थापत्तिही तशीच होते, म्हणून इष्ट असल्यास तशी योजना करावी. कदाचित् आपण म्हणाल कीं, सदाशिव तर आमच्याच त्रयींतला, माझीच मूर्ति आहे, तेव्हां त्याच्या मनोविनोदास कारण मीच आहें यांत कांहीं आश्चर्य नाहीं; परंतु त्याहून इतरांस मी वश होतों कीं काय या आशंकेचें निवारण करित होत्साते कवि पुढलें विशेषण देतात.-**स्वदासवशमानसा**,-हे स्वदासवशमानसा, **स्वदास**-आपले सेवक-भक्त प्रल्हादअजामिळादि, त्यांस-**वश**-अनुकूल-आधीन आहे-**मानस**-अंतःकरण, ज्याचें असा तूं; जे अनन्यभावेंकरून तुला शरण येतात, या भवसागरांतून पार उतरविण्यास तुजवांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं असें समजून जे तुझीच कांस धरून तुझ्या भजनी लागतात, त्यांसच तू वश होतोस, आणि त्यांचे मनोरथ पूर्ण करतोस, अशीं तुझींच वचनें प्रमाण आहेत.

---

१ भागवतांत भीष्मानें कालमाहात्म्य सांगितलें आहे;—

सर्वंकालकृतंमन्येभवतांचयदप्रियं ।
सपालोयद्वशेलोको वायोरिवघनावलिः ॥

स्कं. १, अ. ९, श्लोक १४.

भागवतांत कपिलमुनीनें देवहूतीस भक्तियोग सांगितला आहे त्यांत कालमाहात्म्य वर्णिलें आहे,—

रूपभेदास्पदंदिव्यं कालइत्यभिधीयते ।
भूतानांमहदादीनांयतोभिन्नदृशांभयम् ॥

स्कं. ३, अ. ९, श्लो. २९

योऽतः प्रविश्यभूतानिभूतैरत्त्यखिलाश्रयः ।
सविष्ण्वाख्योऽधियज्ञोऽसौकालःकलयतांप्रभुः ॥

स्कं. ३, अ. २९, श्लोक ३८.

२ मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ।

भ. गीता अ. १२, श्लो. १४.

अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ।
तेषामहं समुद्धर्तामृत्युसंसारसागरात् ॥

भ. गी. अ. १२, श्लो ६-७.

कदाचित् आपण म्हणाल कीं, पापापासून अलिप्त असून शुद्धांतःकरण होत्साते जे मला शरण येतात, त्यांसच मी वश होतों, तुजसारिखे जे पापग्रस्त आहेत त्यांजवर मी कदापि अनुग्रह करीत नाहीं; त्यांस, हें सत्य आहे, तथापि पापी जनांचें पाप दूर करण्याचेंहि सामर्थ्य आपलेंच आहे, आपणावांचून इतके महत्कार्य करण्यास इतर कोणी समर्थ नाहीं; पापपराजित जे आम्हीं केवळ अशक्त जीव, त्या आम्हांस इतक्या महच्छत्रूंच्या हातांतून सोडवून मग अनुग्रह करणारे आपणच, याप्रमाणे आशंका निवारित होत्साते कवि पुढलीं दोन विशेषणें देऊन म्हणतातः—
**कलिमलांतका, कामदा,**—हे कलिमलांतका, हे कामदा, कलिमल–पाप, त्याचा–अंतक–अंत करणारा–नाश करणारा, असा तू; येथें अंतक या शब्दानें पापाचें शत्रुत्व ध्वनित होतें, पापरूप जो आमचा महान् शत्रु त्याचा नाश करणारा तूच आहेस; आणि असा त्याचा नाश केल्यावर मग–कामदा, काम–मनोरथ–इच्छा, याते देणारा, असा तूच, निर्मलांतःकरण जे तुझे शरणागत भक्त त्यांचे सर्व मनोरथ परिपूर्ण करणारा तूच आहेस, म्हणूनच तुला भक्तकामकल्पद्रुम असें म्हणतात. परंतु येथें 'काम' म्हणजे ऐहिकराज्यादिभोगेच्छा असा अर्थ कोणी मनांत आणील, अथवा आपले सेवक किंवा याचक यांचे मनोरथ पूर्ण करणारे कर्णादि दाते पुराणप्रसिद्ध आहेतच, मग 'कामद' या विशेषणानें विशेषार्थापत्ति ती कोणती अशी आशंका घेईल, तर तसें न व्हावें या हेतूस्तव, अथवा आपल्या अभिप्रेतार्थास दार्ढ्य यावें या हेतूस्तव, कवि पुढले विशेषण देऊन म्हणतात–
**वदान्यजनसद्गुरो,**—हे वदान्यजनसद्गुरो, वदान्यजन–उदारजन–कर्णप्रभृति जे महान् विख्यात दातेजन, त्यांचा–सद्गुरु स्वामी–आचार्य, असा तू; त्या सर्वांस औदार्याविषयीं उपदेश तुझा आहे, तुझ्या प्रेरणेवांचून उदार जनांची औदार्यकर्माविषयीं प्रवृत्ति असंभवनीय, म्हणून सर्व दातेजनांचा तू आचार्य आहेस; अतएव त्या सर्वांत तू अत्यंत श्रेष्ठ होस, तुजपरता दुसरा वदान्य कोणी नाहीं असा अर्थ. (येथें जे 'सद्गुरो' म्हणोन संबोधनाचें रूप आहे, तें संस्कृत व्याकरणाच्या नियमाप्रमाणें). [पूर्वपक्ष] जर मी असा सर्व वदान्य जनांत श्रेष्ठ आहे, आणि मजपरता दुसरा कोणी दाता नाहीं, तर मग लोक मला शरण येऊन माझा अनुग्रह संपादण्याकरितां कां धजत नाहीत? असें कदाचित् आपण पुसाल तर, यांत महाराज आपल्या वदान्यत्वास किमपि बाध न येतां उलटें यांत अशा लोकांचेंच

नाऽहं वसामि वैकुंठे योगीनांहृदयेरवौ ।
मद्भक्तायत्रगायंति तत्र तिष्ठामि नारद ॥

१ स्युर्वदान्यस्थूललक्ष्यदानशौंडाबहुप्रदे ।
—इत्यमरः

दौर्भाग्य तर काय सांगावें! परंतु अहंकारजन्य पातित्यहि उपलब्ध होतें. तथापि याहि पातित्यापासून उद्धार करून त्यांजवरहि अनुग्रह करणार आपणच, अशा अर्थाची विवक्षा करित होत्साते कवि पुढलें विशेषण देतात.–प्रशमितामितासन्मदा,–हे प्रशमितामितासन्मदा, प्रशमित–अत्यंत शमविले आहेत, अमित–पुष्कळ, असे जे–असत्–दुष्ट, त्यांचे–मद–गर्व–अहंकार इ०, ज्याणें असा तू. (अथवा येथे अमित हे असत् या एका शब्दाचे विशेषण न करितां असन्मद या संयुक्त शब्दाचें विशेषण करून कर्मधारय समास केला तरी चालेल; अथवा असन्मद येथें षष्ठीतत्पुरुष न करितां कर्मधारय केला तरी चालेल. परंतु उभय-पक्षीं अर्थास किंचित् गौणत्व येनें म्हणून वरचा पक्ष विशेषार्थवान् जाणून घेतला आहे). सर्व वदान्यजनांत श्रेष्ठ, अतएव अत्यंत कारुणिक जो तू त्या तुला शरण न जातां हिरण्यकशिपुरावणकंसचाणूरादि जे जे आपल्या गर्वांत राहिले, त्या त्या असंख्य मदोन्मत्त जनांचा तो गर्व त्वांच उतरविला, अर्थात त्यांच्या दातीं तृण देऊन शरणागत करून त्यांस आपलें दयापात्र त्वांच केलें. या शेवटल्या पदानें तर मोरोपंताने भगवंताचा पतितपावनत्व म्हणून जो अत्यंत कारुण्यरूप गुण, त्याचें वर्णन करून दाखविलें असें समजावें. [ पूर्वपक्ष ]–बरें जसें त्वां आतां माझें वर्णन केलें तसा जर मीं आहें, तर मग ते ते गुण दाखविणारीं चिन्हें माझ्या अंगीं कोठें आहेत? अशी आशंका कवि म्हणतात कदाचित् आपण घ्याल, तर महाराज तीं चिन्हे कोठें आहेत म्हणून काय पुसतां, तीं तर आपण आयुधरूपेंकरून निरंतर धारण करितां, याप्रकारें आशंकेचें निवारण करित होत्साते कवि शेवटलें विशेषण देऊन नमस्कार करितात.–गदारिदरनंदकांबुजधरा,–हे गदारिदरनंद-कांबुजधरा, गदा–प्रसिद्ध, अथवा शुद्ध मराठी पर्याय म्हटला म्हणजे सोटगा, अरि–चक्र, दर–शंख आणि नंदक–आनंद करणारें असें जें–अंबुज–कमल यांतें धरा–धारण करणारा असा तू त्याचें संबोधन. विष्णूच्या खड्गाचें नांवहि नंदक असें आहे[2], त्यातें धारण करणारा, अशा अर्थाचीहि प्रसिद्धि असेल, परंतु तसा अर्थ केला असतां प्रसिद्ध जी शंखचक्रगदापद्मधारी चतुर्भुजात्मक विष्णुमूर्ति[3],

---

१ शंखभृन्नंदकीचक्रीशार्ङ्गधन्वागदाधरः।
रथांगपाणिरक्षोभ्यः सर्वप्रहरणायुधः॥
वि. स. नाम. श्लो. १०७

२ कौमोदकीगदाखड्गो नंदकः कौस्तुभोमणिः। –अमर

३ चतुरात्माचतुर्व्यूहश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः।
चतुर्मूर्तिश्चतुर्बाहुश्चतुर्व्यूहश्चतुर्गतिः॥
वि. स. नाम. श्लोक ८२

तिच्या हस्तसंख्येहून ही आयुधसंख्या एकाधिक होऊन त्या अवशिष्ट राहिलेल्या आयुधास निराधारत्व येऊं पाहातें, म्हणून येथें नंदक हें पुढल्या अंबुज शब्दाचें विशेषण मानावें म्हणजे या आशंकेचें निवारण होईल असें मला वाटतें. वरकड सर्वशक्तिमान् अशा भगवंताच्या हस्तावयवांची नियमितसंख्याक कल्पना करून तेथें बुद्धीस अटकवून ठेवणें हा अज्ञानमूलक मनोव्यापार होय; कारण परमेश्वर अनंतहस्त, अनंतपाद, अनंतनेत्र, असा आहे[1]; म्हणून आपल्या भक्तजनांचें संकट निवारण्याकरितां, अथवा आपला प्रभाव व गौरव प्रगट करण्याकरितां, अथवा सद्धर्म संस्थापण्याकरितां, जेव्हां जेव्हां ही पंचायुधें धरण्याचा त्यास प्रसंग येतो, तेव्हां तेव्हां पांच हात प्रगट करून त्यांनीं तीं धारण करणार नाही असेंहि संभवत नाही; अशी कल्पना केल्यावर मग नंदक हें विशेषण न॰ करितां त्याचा अर्थ खड्ग सुखानें मानावा. अथवा पंचायुधें धरण्याचा एककालिक प्रसंग मनांत न आणितां कार्यपरत्वें एका एका आयुधाचें धारण तत्तत्प्रसंगीं विवक्षित मानिलें, व असें मानण्यास कांहीं बाध येतो असेंहि नाही, तर मग पंचहस्तांचीहि कल्पना करण्यास अवकाश न देतां चतुर्भुजांतून

---

१ विश्वतोबाहुरितिश्रुतेः ।

नमोस्त्वनंतायसहस्रमूर्तयेसहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।

वि. स. नाम. श्लोक १३२

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ॥

भ. गी. अ. ११, श्लो. १६

क्रोधहाक्रोधकृत्कर्ता विश्वबाहुर्महीधरः ।

वि. स. नाम. श्लो. ३४

हरिसहस्रशिरसंसहस्रचरणेक्षणम् ।
सहस्रबाहुमुकुटंसहस्रवदनोज्ज्वलम् ॥

भी. स्तवराज श्लो. २५

पश्यंत्यदोरूपमदभ्रचक्षुषा सहस्रपादोरुभुजाननाद्भुतं ।
सहस्रमूर्धश्रवणाक्षिनासिकं सहस्रमौल्यंबरकुंडलोल्लसत् ॥

भागव. प्र. स्कं., अ. ३, श्लोक ४

तुकोबानेंहि म्हटलें आहे.

रूप दावि कांरे आतां । सहस्र भुजांच्यामंडिता ।

एकाने पांचव्या खड्गाचेंहि धारण सुकर होतें. अथवा येथें कमलाचें अधिष्ठान हस्त न मानितां जर विष्णूची नाभि मानिली, तर मग पूर्वोक्त आशंकेस अवकाश न राहातां विष्णूचें चतुर्हस्तांनी नंदकादि चतुरायुधांचें धारकत्वहि अबाधित राहातें, आणि असें मानण्यास विष्णूचें पद्मनाभ म्हणून जें प्रसिद्ध नाम आहे तेंच प्रमाण.[1] येथें आणखी सूक्ष्म विचारानें पाहिलें असतां असें दिसतें की, गदादि पंचायुधांचे जे येथें कवीनें विधान केलें आहे, तेंहि यथासंख्य परंतु व्युत्क्रमानें, म्हणजे पूर्वोक्त **प्रशमितामितासन्मदादि** अव्यवहित एका मागें एक अशा पांच विशेषणांनीं सूचित जीं भगवद्गुणोल्लसित कार्यें त्यांच्या साधनास अनुकूल असें आहे. पाहा–अमित असन्मदातें प्रशमित करणारी अशी **गदा** होय. कारण, मद म्हणजे अहंकारमूलक मनोविकार, याच्या ठायीं निरंतर उन्नतीची भावना असते, म्हणूनच मदोन्मत्त पुरुषाची मान निरंतर वर राहाते, त्याचें प्रशमन म्हणजे अधःपतन करण्यास, म्हणजे त्यास खालीं पाडण्यास योग्य साधन म्हटलें म्हणजे गदा होय; द्रव्य, कुल, ज्ञान, वैभव, इत्यादिकांचा अभिमान धरून कोणी उन्मत्त झाला की, त्याच्या मस्तकावर भगवंताची गदा पडून तिनें त्यास खालीं पाडिलेंच असे समजावें. **वदान्यजनसद्गुरु** या विशेषणानें भगवंताच्या सद्बुद्धि-प्रेरकत्वगुणाचा अथवा भक्तसंकटनिवारकत्वगुणाचा अथवा भक्तवरदत्वगुणाचा बोध होतो, तेव्हां तत्कार्यसाधनास योग्य **अरि** म्हणजे चक्र होय. अर्थात् त्याचें सुदर्शन होयें.[2] तसेंच तिसरा **कामदत्वरूप** म्हणजे भक्तमनोरथपरिपूरकत्वरूप जो भगवद्गुण तत्प्रसिद्ध्यर्थ **दर** म्हणजे शंख हें दीर्घ आणि गंभीर असा घोष

---

१ नमोऽस्तुपद्मनाभाय ।

ग. मोक्ष. श्लोक ६५

नाभिप्रजातकमलासनसंस्तुताय ।

ग. मोक्ष. श्लोक ७०

अजस्यनाभ्यांसंभूतं यस्मिन्विश्वंप्रतिष्ठितं ।

पुष्करंपुष्कराक्षस्य तस्मैपद्मात्मनेनमः ॥

भी. स्तवराज, श्लोक. ६१

२ गजेंद्रमोक्षांत विष्णुस्तुतींत भगवंतास " **भक्तिप्रियायवरदीप्तिसुदर्शनाय** " असें म्हटलें आहे. एणें **वरदीप्ति** हें सुदर्शनाचें विशेषण योजिलें आहे. वर म्हणजे भक्तांस इष्ट जी सद्बुद्धिप्रेरणरूप क्रिया, तदुत्पन्न जी दीप्ति म्हणजे अंतःप्रकाश, तद्रूप असें आहे सुदर्शन ज्याचें.

करणारे आयुध असल्यानें योग्य साधन होय. परमकारुणिक भगवान् विष्णु या आयुधानें सर्व जनांस कळवितो कीं, जे अनन्यभावेंकरून मला शरण येतात, त्यांचे सन्मनोरथ परिपूर्ण करण्यास मी समर्थ आहें; अथवा माझ्या भक्तांस जे छळितात त्या दुष्टांचा नाश करून त्या भक्तांस आश्रय देणारा मीच आहें, हें प्रस्फुट करण्यास्तव त्याचें पांचजन्यधारकत्व समजावें. ज्या काळीं भीष्मकृपाचार्यासारखे प्रचंड योद्धे आपले अधिपति असल्यानें सगर्व झालेली अशी कौरवांची महत्सेना पांडवांनीं पाहिली, आणि तिच्या दर्शनेंकरून जेव्हां अर्जुन भ्याला, त्या काळीं कृष्ण त्याचा सारथि असतां त्यानें आपला पांचजन्य फुंकला; असें करण्याचा हेतु हाच दिसतो कीं, येथें पांडवांस अभय द्यावें, आणि तेथें दुर्योधनादि उन्मत्त वीरांस सुचवावें कीं, यद्यपि पांडव दुर्बल आहेत, तथापि यांचा रक्षिता मी भगवान् कृष्ण आहे, अतएव इष्ट जी विजयलक्ष्मी ती मी आपल्या आश्रितांसच देणार, हे तुम्हीं सारे पक्केपणीं समजा. **कलिमलांतक** या विशेषणेंकरून पापाचें शत्रुत्व दर्शविलें आहे म्हणून पूर्वींच सांगितलें, तेव्हां शत्रुवधार्थ **नंदक** नामें खड्ग म्हणजे तलवार हेंच आयुध योग्य होय. तसेंच **स्वदासवशमानस** या विशेषणानें असें इंगित होतें कीं, भक्तीनेंच भगवदंतःकरणाची प्रसन्नता होते, म्हणून ती प्रसन्नता दाखविण्याकरितां **अंबुज** म्हणजे कमल याचें धारण प्रशस्त होय, कारण, अंतःकरणाची प्रसन्नता आणि कमलाची प्रफुल्लता यांचे विकाशनधर्मत्वेंकरून साधर्म्य उपलभ्यमान होतें. तेव्हां अशा विशेषणांनीं विशिष्ट जो तू त्या-**ते सदा नमः**-तें[1]-तुला, **सदा**-निरंतर, **नमः**-नमस्कार असो. याप्रमाणें कवि शेवटीं या गीर्वाण पदेंकरून भगवंतास नमस्कार करितात.

---

तसेंच भक्त गजेंद्र जेव्हां भगवतानें मकरापासून मुक्त केला, तेव्हां त्याचें संकटनिवारणरूप कार्य, तेंहि भगवंतानें आपल्या चक्रानेंच केलें.

जलस्थदारयामासग्राहंचक्रेणमाधवः ।
मोचयामासनागेंद्रंपाशेभ्यःशरणागतम् ॥

गजेंद्रमोक्ष, श्लोक ९७

भीष्मपर्वांत भगवंतास म्हटलें आहे:—

एह्येहिदेवेशजगन्निवासनमोस्तुतेशार्ङ्गगदासिपाणे ।
प्रसह्यमापातयलोकनाथरथादुदग्राद्भुतशौर्यसंख्ये ॥

तुकारामानेंहि म्हटलें आहे,—

पडतां जडभारी दासीं आठवावा हरी ।
मग तो होऊं नेदी शीण आड घाली सुदर्शन ॥

१ हें युष्मन् शब्दाचें चतुर्थीचें रूप.

ही पहिली केका मंगलाचरणात्मिका असल्यानें महामायोपाधिकहरिहरादि-भगवदवतारपर न लावितां केवळ तदुपाधिरहित सच्चिदानंदरूपपरब्रह्मपर लाविली असतांहि लागायाजोगी आहे, असें माझ्या बुद्धीस वाटतें. ती अशी कीं,- सदाश्रितपदा-एथें सच्छब्देंकरून सच्चिदानंदरूप परब्रह्मांतर्गत सत्पदार्थवाचक जे या विश्वाचें मूल अधिष्ठान, तेणेंकरून आश्रित आहे पद म्हणजे अस्तित्वरूप स्थान ज्याचें, असें जें सद्रूप परब्रह्म तें, अथवा, सत् म्हणजे शुद्ध अस्तित्व तेणेंकरून आश्रित-युक्त आहे पद-सच्चिदानंदरूप पदत्रय-अर्थात् सच्चिदानंदरूपें[2] परब्रह्म तें; अथवा सत् म्हणजे सत्पदेंकरून विलसित जें हें विश्व[3]

---

१ हरिहरादि या सृष्टीचे पालनोपसंहारादिकांचे कर्ते म्हणून मुख्य देव मानिलें आहेत, तेहि या परब्रह्माच्या अलीकडले तदंशेंकरून वर्णिले आहेत.—

ब्रह्माविष्णुमहेश्वरू । हेहि शिणती करितां सृष्ट्यादि व्यापारू ॥
मग सेविती विश्राममंदिरू । परब्रह्म तें ॥ १५ ॥
झाला जरी सर्वेश्वरू । धरिला जरी जाणिवेचा अहंकारू ॥
तरी तोहि नेणे पारू । त्या स्वरूपाचा ॥ १७ ॥

वि. सिं. पू. प्र. २

२ सत्शब्दें बोलिजे अस्तित्वता । कालत्रयीं अबाधिता ॥
मायादेवीसी तत्त्वता । तें अघटमान ॥ १३ ॥

वि. सिं., उ. प्र. ६

सत् म्हणिजे शाश्वत । तेंचि ज्ञानघन म्हणूनि चित् ॥
तेंचि स्वरूप यालागीं म्हणिजेत । आनंद ऐसें ॥ ६ ॥
ऐकें प्रकारांतरें निरूपण । अस्तिभातिप्रियपण ॥
हें पदत्रय मिळून । एकलें ब्रह्म ॥ ७ ॥
अस्ति म्हणिजे आहे । भाति म्हणिजे प्रकाशरूप होय ॥
आणि आपण प्रिय । अद्वयत्वें ॥ ८ ॥
यदस्तितद्भाति । ऐशी असे वेदश्रुती ॥
जें आहे तेंचि प्रकाशरूप म्हणति । तेंचि प्रिय ॥ ९ ॥

वि सिं. उ. प्र. १०

३ जगदिदमीश्वरलीलाविलसितमितिश्रुतेः ।
ज्याच्या सत्पदीं विश्व असे । ज्याच्या चित्पदीं विश्व दिसे ॥
आनंदपदीं विश्व उल्लसे । तो तूं श्रीगुरुसच्चिदानंद ॥

—निगमसार वामनकृत

त्याणें-आश्रित म्हणजे आधृत, आहे-पद म्हणजे अधिष्ठान ज्याचें-तें, अर्थात् या सर्व विश्वाचें अधिष्ठानरूप जें परब्रह्म तें; त्याचें संबोधन. **सदाशिवमनोविनोदास्पदा**-सदाशिव जो महायोगी, त्याचा-मनोविनोद म्हणजे महायोग-निर्विकल्प-समाधिरूप त्याचें-आस्पद-गुरुरूपस्थान-अंतःप्रकाशक; अथवा, सदा-निरंतर शिव-कल्याण-परमानंदरूप तोच अथवा तदात्मक जो-मनोविनोद-मनोविलास तेथ आहे-आस्पद-स्थान ज्याचें-तें, अर्थात् आनंदरूप परब्रह्म; अथवा, सदा-निरंतर, शिव-कल्याण-कैवल्यरूप तत्पूर्वक जो-मनोविनोद-मनाच्या विनोद-मनाचें अवस्थांतर भवन-अर्थात् मनाचे उन्मीलन-उन्मन्यवस्था त्याचें-आस्पद-अधिष्ठान, अर्थात् जेथें मनाचें उन्मीलन होतें तें कैवल्यस्थान, अथवा,

---

१ योग हा प्रथम शिवापासून उत्पन्न झाला म्हणून पुराणप्रसिद्ध इतिहास आहे:—

म्हणूनि शिवादि गुरुपर्यंत । जाणावे जे अवधूत ॥
ते मूर्त ना अमूर्तवत । परब्रह्म ॥ ३२ ॥

वि. सिं., उ. प्र. ११

२ गुरुर्ब्रह्मागुरुर्विष्णुर्गुरुर्देवोमहेश्वरः ।
गुरुरेकः परब्रह्मतस्मैश्रीगुरुवेनमः ॥

मुकुंदराज सद्गुरूच्या वर्णनांत म्हणतात:—

ऐसी प्रतिज्ञा करूनी । शिष्यासन्मुख बैसुनी ॥
आज्ञा समावेश करूनी । गुरुसंप्रदायक्रमें ॥ ९७ ॥

तेथ ज्ञानशक्तीचा प्रकाश । अज्ञानशक्तीचा निरास ॥
बोध उठला स्वयंप्रकाश । शिष्यचैतन्यीं ॥ ९८ ॥

शिवरामस्वामीनें एका पदांत म्हटलें आहे:—

गपकर अंधार होता तेथें खपकर उजेडलें नयनिं दाखवीलें ॥
चंद्रसूर्य नसतां तेथें तेज प्रकाशलें गुरु मला केलें ॥ धृ० ॥

या गुरुदत्तप्रकाशाविषयीं मच्छनाथ म्हणतात.—

अद्वैत केलें गुरुनें दाविली हिऱ्याची खाण ॥
प्रकाश केला गहन संसार आतां कांहीं बोलणें तंव उरलें नाहीं
मी वेडी ग झालें बाई माणुसपण उरलें नाहीं ॥ धृ० ॥

मानपुरी प्रभु म्हणतात:—

नजर न आवे आतमजोती ॥ धृ० ॥
तेल न बाती बुझवही जाती नही दिवस नही राती ॥ १ ॥
जोती प्रकाशे दशदिशा झमके जैसा निरमल मोती ॥ २ ॥

सदा-निरंतर शिव-रुद्र-येणेंकरून उपलक्षित जो काल, त्याचा-मनोविनोद-गुणसाम्याच्या ठायीं जें आद्यस्फुरणें-अर्थात् तेणेंकरून महदादिप्रपंचहेतुक मूलतत्त्वांची आविर्भूति-अर्थात् सर्वजगदाविर्भूति त्या सर्वांस-आस्पद-मूलाधिष्ठान-सच्चिदात्मक परब्रह्म, त्याचें संबोधन. **स्वदासवशमानसा**-स्वदास-आपले दास-निरंतर शुद्धांत:करणानें आणि भक्तिप्रेमरसानें आपलें सेवन करणारे जे भक्तराज नारदादि त्यांसच-वश-मोक्षपद देण्याकरितां प्रसन्न आहे-मानस-अंतःकरण-चिद्वृत्ति ज्याची-असा, त्याचें संबोधन. **कलिमलांतका**-कलि-

---

१ भगवान् कपिलानें देवहूतीस तत्त्वनिर्णय सांगितला आहे. त्यांतहि सांख्यमताप्रमाणें गुणसाम्यरूपा* जी मूलप्रकृति तीतें क्षुब्ध करणारा कालात्मक भगवान् म्हणून वर्णिला आहे;—

प्रकृतेर्गुणसाम्यस्य निर्विशेषस्यमानवि ।
चेष्टायत:सभगवान् कालइत्युपलक्षित: ॥ १७ ॥

अंत:पुरुषरूपेण कालरूपेणयोबहि: ।
समन्वेत्येषसत्वानां भगवानात्ममायया ॥ १८ ॥

भाग. स्क. ३, अ. २६

२ येणेंकरून अनन्यभक्तीनेंच ब्रह्मप्राप्ति असा येथें कवीनें सर्वमतसिद्धांत सुचविला आहे असें समजावें.

श्वेताश्वतर उपनिषदांतहि एतत्सिद्धांतपूर्वकच मंगलाचरण केलें आहे,—

योब्रह्माणंविदधातिपूर्वंयोवैवेदांश्चप्रहिणोतितस्मै ।
तंहदेवमात्मबुद्धिप्रकाशंमुमुक्षुर्वैशरणमहंप्रपद्ये ॥

भगवान् कृष्णानेंहि गीतेंत हेंच सांगितलें आहे:—

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥

भ. गी. अ १४, श्लो. २६

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।

भ. गी. अ ९, श्लो. २९

आणखी हीच भगवद्भक्ति मुख्य पुरुषार्थ म्हणोन भक्तजन तीच वारंवार प्रार्थितात:—

---

* **सत्वरजस्तमसांसाम्यावस्थाप्रकृतिः**—असें सांख्यसूत्र आहे.

कलियुग तत्संबंधीं जो-मल-अज्ञानरूप-मायाऽविद्यात्मक त्याचा-अंतक-नाशक-

नाथयोनिसहस्रेषुयेषुयेषुव्रजाम्यहम् ।
तेषुतेष्वचलाभक्तिरच्युतास्तुसदात्वयि ॥

विष्णुपु.

भक्त तोच महायोगी म्हणून गीतेंत सांगितलें आहे,

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥

भ. गी., अ. ६, श्लो. ४७

ज्ञानदेव म्हणतात,—

भावेंवीण भक्ती भक्तीवीण मक्ती । बळेंवीण शक्ती बोलों नये ॥
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत । उगा राहे निवांत शिणसी वाया ॥
सायासें करीसी प्रपंच दिननिशी । हरीशीं न भजसी कवण्यागुणें ।
ज्ञानदेव म्हणे हरिनाम जपणें । तुटती बंधनें प्रपंचाचीं ॥
तीर्थव्रतनेम भावेंवीण सिद्धि । वायांची उपाधी करीशिल ॥
भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरी ॥
पारदाचा रवा घेतां भुमीवरी । यत्न परोपरी तैसी साधनें ॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥

तुकारामानेंहि ज्ञानापेक्षां भक्तीचें माहात्म्य अधिक म्हणोन वर्णिलें आहे;—

जाणें भक्तिचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥
नायकावे कानी तयाचे ते बोल । भक्तीवीण खोल ज्ञान सांगे ॥
वाखाणी अद्वैत भक्तीभावेंवीण । दुःखपावेशीण श्रोतावक्ता ॥
अहंब्रह्म म्हणूनी पाळीतसे पिंडा । बोलों नये भांडा तयासवें ॥
देवाझलड बोले जो पाखंड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥
तुका म्हणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठयाहोन श्वपचतो ॥
भक्तीचें हें सुख भक्तचि जाणती । दुर्लभयागती आणी काशी ॥
अभेदूनि भेद राखियेला अंगी । वाढावया जगी प्रेमसुख ॥
जाणोनी नेणते जाले तयासुखें । न बोलेनि मुखें बोलताती ॥
टाळघोळ कथा प्रेमाचा सुकाळ । मूढलोकपाळ तरावया ॥
तुका म्हणे आहे तयाशींच ठावें । जिहीं एकभावें साधियेलें ॥

समूळ नष्ट करणारा जो ब्रह्मसाक्षात्कार तद्रूप, त्याचें संबोधन. **कामदा**–काम–मुमुक्षुता–मोक्षप्राप्तीच्छा, तीते देणारा–मोक्षप्रद–अंतर्ज्ञानप्रकाशक[2]–ब्रह्मानंद देणारा, त्याचें संबोधन. **वदान्यजनसद्गुरो**–वदान्य–उदारांतःकरण असा जो–जन–लोक–महात्मा–आस्तंभब्रह्मांडव्यापकेश्वरमहत्त्वातें आत्मज्ञानेंकरून अनुभवून महात्मता ज्यांस प्राप्त झाली आहे असे[3] त्यांचा–सद्गुरु–ती महात्मता देण्यास परम समर्थ, त्याचे संबोधन. **प्रशमितामितासन्मदा**–प्रशमित–अत्यंततेनें शमविले आहे–अर्थात् नष्ट केलें आहे, अमित–अपार, असन्मद–मिथ्यामदअहंकारजन्यप्रपंचमिथ्याज्ञान–मूलाऽविद्यात्मक–ज्याणें; त्याचें संबोधन. **गदारिदरनंदकांबुजधरा**–गदा–अहंकृतिजन्यप्रपंचमिथ्याज्ञानसद्बुद्धीतें जागृत करणारी जी भगवच्चिच्छक्ति तिचें उपलक्षण, अरि–चक्र–सत्ज्ञानरूप जो अंतःप्रकाश

---

वृक्ष नेदी फळ । काय करी वसंत काळ ॥
तुका म्हणे भक्तीवीण । फळ नाही नाही जाण ॥

या आपल्या कवीने आणखी एके ठिकाणी भक्तीचें वर्णन एका आर्येत असें केलें आहे की,—

भक्तिविना वश नोहे । वीण्यानें वा मृदंगनादानें ॥
कन्यादानफलातें । पावति की ते मृदंगनादानें ॥

१ गीतेंत म्हटलें आहे
दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥
भ. गी. अ. ७, श्लो. १४

श्वेताश्वतर उपनिषदांत म्हटलें आहे;—
मायांतुप्रकृतिंविद्यान्मायिनंतुमहेश्वरम् ।

२ भक्तिमीमांसेंत भगवंताच्या मोक्षप्रदत्वरूप गुणांचें लक्षण केलें आहे तें असें;–
भगवानेवात्मभक्तेस्त्रिगुणात्मकांतःकरणलयपूर्वकब्रह्मानंदावाप्तिलक्षणमुक्तिहेतुः

३ अशा माहात्म्यांचें लक्षण आचार्यांनीं मनीषापंचकांत सांगितलें आहे,—
जागृत्स्वप्नसुषुप्तिषुस्फुटतरायासंविदुज्जृंभते ।
याब्रह्मादिपिपीलिकान्ततनुषुप्रोताजगत्साक्षिणी ॥
सैवाहंनतुदृश्यवस्त्विवतिदृढप्रज्ञापियस्यास्तिचेत् ।
चांडालोपिसतुद्विजोऽस्तुगुरुरित्येषामनीषामम ॥

तुकोबाहि म्हणतात;
अणुरेणुथोडका । तुका आकाशाएवढा ॥

त्याचे उपलक्षण, दर-शंख-नादमूलक जो प्रणव-ओंकार, त्याचे प्रतिरूपक, नंदक-विष्णूचें खड्ग-अज्ञानरूप अथवा संशयरूप जी हृदयग्रंथि तिचे छेदक जें आत्मज्ञान त्याचें प्रतिरूपक, अंबुज-कमळ-संसारदुःखेंकरून पीडित जो ज

१ विष्णुसहस्रनामभाष्यांत म्हटलें आहे;—

मनस्तत्वात्मकंचक्रंबुद्धितत्वाभिकागदा ।
जगद्रक्षार्थंधरतीतिशंखचक्रगदाधरः ॥

२ ओंकार हा मूलनादब्रह्मात्मक शब्द केवळ ब्रह्मस्वरूपवाचक होय. म्हणून श्रुतिस्मृतींत याचें गौरव वर्णिलें आहे;—

**ओमित्येकाक्षरंब्रह्म**-अशी श्रुति आहे.

वायुपुराणांत सर्व मंत्रांत हा शब्द नायक होय. म्हणून शिवानें भवानीस सांगितलें आहे;—

ओंकारःप्रणवोब्रह्मसर्वमंत्रेषुनायकः ।
आदौसर्वत्रयुंजीतमन्त्राणांचशुभानने ॥

गीतेंतहि कृष्णानें अर्जुनास या शब्दाचें माहात्म्य सांगितलें आहे;—

ॐइत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥
भ. गी. अ. ८, श्लो. १३

यावर ज्ञानेश्वर म्हणतात,

तैसें ओंहें स्मरों सरे । आणि तेथेंचि प्राणपुरे ॥
मग प्रणवातीत उरे । पूर्णघनजें ॥ १७ ॥
म्हणोनि प्रणवैक नाम । हें एकाक्षरब्रह्म ॥
जो माझें स्वरूपपरम । स्मरतसाता ॥ १८ ॥

विवेकसिंधूच्या पूर्वार्धांतील सहाव्या प्रकरणांत या प्रणवाचें स्वरूप, व त्याच्या अवयवाचें वर्णन, विस्तारपूर्वक आणि अत्यंत गांभीर्यानें मुकुंदराजानें केलें आहे, तें इष्ट असल्यास पाहावें.

३ भिद्यतेहृदयग्रंथिश्छिद्यंतेसर्वसंशयाः ।
क्षीयंतेचास्यकर्माणितस्मिन्दृष्टेपरावरे* ॥

—इतिश्रुतिः

* ही श्रुति श्लोकरूपानें भागवतांतहि कांही पाठभेदेंकरून आढळते.

त्याच्या म्लान आणि आकुंचित अंतःकरणाचे भगवद्भक्तिजन्यप्रेमानंदानें जे विकाशन, त्याचे निदर्शन, या सर्व चिन्हांतें धारण करणारा, अर्थात् या सर्व उपलक्षणांनीं उपलक्षित परब्रह्मरूप जो भगवान् त्याचे संबोधन. असा सच्चिदानंदरूप जो तू त्या-ते सदा नमः-ते-तुला, सदा निरंतर-अव्यवहितभक्तिप्रेमपुरःसर, नमः-नमस्कार-एकाग्रचित्तेंकरून अंतःकरणाची अत्यंत लीनता असो.

---

आत्मारामाश्चमुनयोनिर्ग्रंथाअप्युरुक्रमे ।
कुर्वंत्यहैतुकी भक्तिमित्थंभूतगुणोहरिः ॥

भाग. स्कं. १, अ. ७, श्लोक १०

१ याप्रमाणें भगवद्भक्तीनें मनाची प्रसन्नता भागवतांत सांगितली आहे;—

अतोवैकवयोनित्यंभक्तिंपरमयामुदा
वासुदेवेभगवतिकुर्वंत्यात्मप्रसादनीं

भाग. स्कं १, अ २, श्लोक. २२.

एवंप्रसन्नमनसोभगवद्भक्तियोगतः ।
भगवत्तत्त्वविज्ञानंमुक्तसंगस्यजायते ॥

भाग. स्कं. १, अ. २, श्लोक २१

पदाब्जरजजेंतुझेंसकलपावनाधारतें ।
अघाचळहितारिलेबहुतुवांचिराधारतें ॥
अजामिळअघासुरव्रजवधूबकीपिंगळा ।
अशांगतिदिलीउरेनतृणभेटतांविंगळा ॥ २ ॥

पहिल्या केकेत कवींनी प्रथमतः भगवंताच्या चरणकमलाचे ध्यान करून स्तुतीस आरंभ केला, म्हणून आतां त्याच चरणकमलाचे माहात्म्य वर्णित होत्साते कवि पुढल्या दोन केकांस आरंभ करितात यापमाणें आपले अतिदैन्य, अथवा अत्यंत नम्रीभाव, अथवा तद्भावपूर्वक विज्ञप्ति, प्रकट कर्तव्य असतां थोरांसमोर साक्षात् अभिवाद न करितां त्यांच्या चरणस्पर्शनाची अथवा चरणाप्रत स्वमनोगतार्थ निवेदन करण्याची जनरूढि आहे. कारण तसा साक्षात् अभिवाद केल्यानें अभिवादकाचें किंचित् औद्धत्य इंगित होतें. आपल्या चरणाजवळ माझी हीच विनंती आहे, अशा प्रकारें नम्रतापूर्वक बोलण्याचा लोकव्यवहार प्रसिद्ध आहे. यास्तव कवि या आणि पुढल्या केकेत भगवंताच्या चरणाचा स्तव करित होत्साते म्हणतात.

पदान्वयः—तुझें जे पदाब्जरज ते सकलपावनाधार, राधारते तुवांचि बहु अघाचळहि तारिले, अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा, अशां गति दिली, विंगळा भेटतां तृण न उरे.

मागल्या केकेत आरंभींच ' सदाश्रितपदा ' या संबोधनानें तें भगवच्चरणाचें माहात्म्य सुचविलें, त्याचा उपन्यास करून कवि तेंच भगवच्चरणाचें माहात्म्य वर्णन करण्यास आरंभ करितात. कवि भगवंतास म्हणतात,–तुझ्या पदाचें तर माहात्म्य थोर आहेच, परंतु–तुझें जें पदाब्जरज तें सकलपावनाधार–तुझें जें पदाब्जरज–चरणकमलसंबंधीं रज–धुलि[१] तें सकलपावनाधार–सकलांस पावन–पावन करणारीं– पवित्र करणारीं–लोकप्रसिद्ध गंगादि पवित्र तीर्थें–अथवा यज्ञदानादि पवित्र कर्में, त्यांस–आधार–आधारभूत होय. गंगा विष्णुपदापासून निर्माण झाली आहे म्हणून, अर्थात् तुझ्या चरणरजाचा आश्रय तिनें केला आहे म्हणून, ती पावनकर्त्री; नाहीं तर तिच्याच अंगीं त्या आश्रयावांचून पावन करण्याचें सामर्थ्य नाहीं. अतएव तुझी चरणधूलिच सकल पापी जनास पवित्र करण्यास समर्थ होय, मग साक्षात् चरणमहिमा काय वर्णावा; असा एथें काव्यार्थापत्ति अलंकार जाणावा. त्वां इतकें माझ्या चरणरजाचें माहात्म्य वर्णिलें, तर असें

१ रज शब्द संस्कृतांत नपुंसक होय.

२ त्याचप्रमाणें शंकराचार्यांनीहि सौंदर्यलहरीत भगवतीच्या चरणकमलाच्या रजाचें माहात्म्य वर्णिलें आहे,—

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणे झाल्यास लगेच आम्हास कळवावे. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळा अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरने अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. ने रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास ॥.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीने किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नाव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणे कळवावे.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखात योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसे पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला**

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जाग्रण व मानसिक
श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध रहावें

बाळबाळंतिणी करितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसाचा ८१४, बाळंत काढा नं. २ दहा दिवसानतर ८१४, बाळकडू-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ८८, कुमारी आसव लहान मुलांकरिता ८१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१० } द्राक्षासव { अर्धी रत्तल ८१४
दीड रत्तल २८४ } { ट ख पॅ नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवे, अरिष्टे, भस्मे वगैरे ५०० वर औषधे तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटे आली असता पाठवू.

दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स
आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणे.
टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना ठाकुरद्वार मुंबई नं० २

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें अनंत आत्माराम मोरमकर यानीं छापून
ज्ञेड यांनी ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रे येथें प्रसिद्ध केलें.

१०२८

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ६ वें ] [ अंक ६-७

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका

स्फुट विषय

,, कै. वा. अण्णासाहेब दाभोळकरांविषयीं दोन शब्द १-१५

,, नाममहिमा ... . ... .. १-१८

केकावली

,, यशोदा पांडुरंगी टीकेसहित

,, ले. कै. रा. ब. दादोबा पांडुरंग ... १७—४०

अर्वाचीन श्री भक्तलीलामृत

श्री दासगणू कृत .. .. .. ९-१६

## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावली** या भक्तिरसप्रेमामृताने ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" ही टीका या अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ही टीका सुमारे साठ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली होती, आणि आजमितीस हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ झाला आहे. तरी ग्राहक याचा फायदा घेऊन ऋणी करतील अशी आशा आहे.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

## श्री साईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यानीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक

## ॥.श्री साई सद्गुरुभ्योनमः ॥

सा. न. वि. वि. खालील मजकुरास श्री साईलीलेंत एखादे कोंपरी स्थळ द्यावे अशी सप्रेम विनंती आहे.

कै. श्रीयुत मित्रवर्य व भक्तश्रेष्ठ गोविंदराव रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांच्या संबंधाने माझे दोन शब्द.

मदाक्रांता

सांई माते, करुण सरिते, प्रेमचित्ते, नितांते[1] ।
नेले नेले, अहह सहसा[2], निर्घृणें त्या कृतांतें ।
अण्णासाहेब, मधुनि अम्हां, भक्तरत्नासि नेलें ।
अंबे इच्छे, तव नच पुढें, त्या विधी[3]चेंहि चाले ॥ १ ॥

शिखरिणी

अगा सांई इच्छे, सुख असु[4]ख गुच्छें[5] भगवती ।
सुधा क्ष्वेड क्ष्वेडां[6]ऽमृत करिशि गे तूं बलवती ॥
विचित्राऽगम्यागे तव गहन लीला नच मिती ।
अशा तूंते मौनें, शरण तव पायीं नति[7] तैंती ॥ २ ॥

स्रग्धरा

ज्यांना "हेमाडपंते" त्यभिनव पदवी दीधली सांई राजा ।
ज्यांना प्रख्यात वैद्यें[8] "महिपति दुसरे" ही दिली अन्य संज्ञा ।
ज्यांचा आयुष्य भानू गुरु पद परिचर्येंत अस्तास गला ।
त्या श्री गोविंद पादा नमुनि लिहित मी आदरें तत्कृतीला ॥ ३ ॥

---

१ अत्यंत. २ एकाएकीं. ३ ब्रह्मदेव. ४ दुःख. ५ झुबका, समुदाय, गाठोडें. ६ विष
७ प्रणिपात पंक्ति. ८ विद्वद्रत्न चिं. वि. ऊर्फ नानासाहेब वैद्य एम. ए, एलएल. बी.

सुमारें २५-२६ वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध श्रीमान् शेठ राजाराम यांच्या वांद्रे येथील बंगल्यांत काहीं कारणाने माझी व कै. अण्णासाहेब दाभोळकर व कै. काकासाहेब दीक्षित याची प्रथम भेट झाली त्यापूर्वी आम्ही तिघेजण एकमेकांस नांवाने ओळखीत असूं. परंतु एके ठिकाणीं बोलण्याचालण्याचा, बसण्याउठण्याचा, किंवा कामकाज करण्याचा प्रसंग केव्हाच न आल्यामुळें आमचा एकमेकांशीं विशेष परिचय नव्हता. कै. नानासाहेब चांदोरकर यांच्या प्रमक स्वप्नांतील व नंतर प्रत्यक्ष भटीची हकीकत मी श्री सांईलीलेच्या १ रे वर्षाच्या सहावे अंकांत पूर्वीच दिली आहे ह्या भेटी प्रथम सन १९१० सालाचे प्रारंभीं झाल्या व तेव्हापासून नानासाहेबांचा व माझा विशेप परिचय झाला. श्री बाबाच्या कृपेने तर खरेच, परंतु नानासाहब्रांच्या मुखातून, जवळ जवळ त्याच सालांत निरनिराळे वेळीं, निरनिराळे स्थळीं, व निरनिराळ्या कारणांनीं बाबांच्या अमृतमय व रसाळ लीला श्रवण केल्या त्यावरून व काहीं अंशीं नानासाहेबाच्या प्रेमयुक्त आग्रहपूर्वक सांगण्यावरून आम्ही तिघे त्याच सालीं, पण निरनिराळे वेळीं बाबांचे दर्शनास गेलों तेथे आमच्या सर्वांच्या कित्येक वेळीं नंतर गांठीही पडल्या, पण काकासाहेबाचा, अण्णासाहेबांचा व माझा विशेष परिचय झाला नाहीं. तो परिचय बाबांच्या पुण्यकृपेने सन १९२२-२३ सालापासून झाला.

श्री समर्थ बाबांनीं आपला दिव्य देह सन १९१८ चे ऑक्टोबर महिन्याचे १५ वे तारखेस ठेविला. नंतर ४ वर्षांनीं म्हणजे ता. १३-२-२२ रोजीं शिरडी संस्थानच्या व्यवस्थेची योजना अहमदनगर डिस्ट्रीक कोर्टाकडून मंजूर करण्यांत आली. त्या योजनेत काकासाहेब दीक्षित व अण्णासाहेब दाभोळकर यांना अनुक्रमे संस्थानचे चिटणीस व खजिनदार नेमण्यांत आले. तेव्हापासून अण्णासाहेबांनीं शिर्डी संस्थानची व श्री बाबांची व अप्रत्यक्षपणे जनीजनार्दनाची सेवा भक्तियुक्त अंतःकरणाने आपल्या निधनकालच्या शेवटच्या क्षणापर्यंत केली. शिर्डी संस्थानचा कायम फंड निदान एक लक्ष रुपयेपर्यंत, केव्हां व कसा गोळा होईल याची रात्रंदिवस त्यांना

काळजी लागून राहिली होता. त्यांच्याकडे मुख्यतः तीन कामे होतीं. संस्थानच्या पैशांच्या जमाखर्चाचें काम, कै. श्री. अण्णा चिंचणीकर यांनीं श्री समर्थ बाबांना अर्पण केलेल्या आपल्या स्थावर जंगम मिळकतीच्या व्यवस्थेचे काम, व श्री साईलीलेचे काम. हीं तिन्ही कामें ते फार सचोटीने, सरळपणानें, व भक्तियुक्त अंतःकरणानें करीत. ते आपल्या कामांत कधींही आळस, उडवाउडव अगर हयगय करीत नसत. ही सर्व सेवा बाबाची असें समजून हीं तिन्ही कामे ते जिवापाड मेहनत करून करीत. बाबांच्या ठिकाणीं त्यांची भक्ति निस्सीम व अलोट होती यांत शंका नाहीं. अलीकडे ५-६ वर्षे त्यांच्या बरोबर काम करण्याची संधि मला मिळाली हे माझे महद्भाग्य मी समजतों. त्यामुळे त्यांचे ठिकाणीं असलेल्या शांति, भूतदया, परोपकार, आर्जव, तितिक्षा, चिकाटी, इरूप, व गुरुभक्ति आदिकरून मोक्षैक फळ देणाऱ्या सात्विक गुणाचा विकास होत चाललेला मला चांगलाच पाहावयास मिळे.

ते कोणाबद्दल केव्हां चुकूनही विरुद्ध बोलत नसत. व आपण बोलूं लागलों तर तसें बोलण्याबद्दल ते आपल्यास दोष देत, व मोडून काढीत. ते कधीं रागावत नसत. व रागावलेच तर त्याच्या रागांत अनुराग असे. बाबाच्या सर्व भक्तांबद्दल त्यांना प्रेम, कौतुक व आदर वाटे. बाबाचे कामांत ते अगदीं चोख व फार दक्ष असत. त्या करितां त्यांना कितीही श्रम पडले तरी त्याची ते पर्वा करीत नसत.

अण्णासाहेबानीं श्री सांईसच्चरिताचे अध्याय लिहिण्याचे पूर्वी त्याचे ठिकाणीं कवित्व शक्ति होती हे मला माहीत नव्हतें त्यांनीं श्री सांईसच्चरिताचे एकदर ५२ अध्याय लिहिले आहेत व ते श्री साईलीलेच्या पहिल्या वर्षाच्या १ ल्या अंकांपासून ६ वे वर्षाच्या १–२ ऱ्या अंकापर्यंतच्या अंकांमधून प्रसिद्ध केले आहेत. हे चरित्र त्यांनीं श्री बाबाच्याच कृपेने व आज्ञेने लिहिले असल्यामुळें उत्तम कवीच्या अगीं जरूर असणाऱ्या मुख्य गुणापैकीं प्रसाद, गुरुभक्ति, व अध्यात्म निरूपण हे गुण त्याच्या कवितेत उत्कृष्ट रीतीने दृष्टीस

* श्री साईलीला अंक २ व ३ आणि १३ वे शतकातील.